महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:एमआयएस-०१२१/सी.आर.२९/२०२१/मा.तं. दिनांक- ३० डिसेंबर, २०२१

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय**:- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने असभ्य, असंस्कृत, असंसदीय व अश्लील भाषेतील टीका-टिपणी/संभाषण इत्यादीसंदर्भात करावयाच्या कारवाईबाबत

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित भरतीप्रक्रियेसंदर्भात एखाद्या विशिष्ट पध्दतीने निर्णय घेण्याबाबत अथवा निर्णय न घेण्याबाबत कोणत्याही प्रकारे प्रयत्न केल्यास अशी कृती आयोगावर दबाव आणण्याचा प्रयत्न समजण्यात येईल व अशा प्रकरणांबाबत आयोगाकडून गंभीर दखल घेण्यात येईल; असे आयोगाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे आयोगाच्या संकेतस्थळावर सूचित करण्यात आले आहे.

२. आयोगाच्या कार्यपध्दतीविषयी आणि/अथवा काही निर्णयांविषयी नाराजी असणाऱ्या, तसेच आयोगाच्या काही निर्णयांमुळे प्रभावित होणाऱ्या उमेदवारांकडून आयोगाच्या कार्यपध्दती आणि/अथवा निर्णयांवर जाहीर टीका-टिपणी करण्यात येते. तथापि, आयोगावर टीका-टिपणी करत असताना शासकीय सेवेत येऊ इच्छिणाऱ्या भावी लोकसेवकांकडून सार्वजनिक सभ्यतेचे भान ठेवून संसदीय व सुसंस्कृत भाषा शैलीचा वापर केला जाणे अपेक्षित आहे. परंतु, काही उमेदवार/व्यक्ती यांच्याकडून विविध प्रसारमाध्यमे/समाजमाध्यमे यावर मत/अभिप्राय व्यक्त करताना किंवा दूरध्वनीवरुन संवाद साधताना असभ्य, असंस्कृत, असंसदीय व अश्लील भाषेचा वापर करण्यात येत असल्याची बाब आयोगाच्या प्रकर्षाने निदर्शनास आली आहे.

३. आयोगास निदर्शनास आलेल्या उपरोक्त बाबींची आयोगाच्या कार्यालयाकडून गंभीर दखल घेण्यात येत असून अशा उमेदवार/व्यक्ती यांच्यावर संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल. तसेच, आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा व निवडीपासून संबंधिताला कायमस्वरुपी अथवा काही विशिष्ट कालावधीसाठी प्रतिरोधित (Debar) करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

ठिकाण- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग